स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

कला विद्याशाखांतर्गत मराठी विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती)

पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंधाचा आराखडा

: अभ्यास विषय :

डॉ.रावसाहेब कसबे यांच्या वैचारिक साहित्याचा चिकित्सक अभ्यास

: संशोधक :

प्रल्हाद शंकरराव येवरीकर

मु. येवरी पो. मंगरूळ ता. जळकोट जि. लातूर

: मार्गदर्शक :

प्रा.डॉ.राजकुमार खंडू मस्के

प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर जि.लातूर

: अभ्यास केंद्र :

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

एप्रिल, २०१६

- **प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्या वैचारिक विश्वात फारसे काही घडत नाही, असा सूर एका बाजूला लावला जात असताना विचारवंत साहित्यिकांच्या लिखाण व भाषणाने वैचारिक विश्व ढवळून निघू लागले आहे. विशेषतः गेल्या काही वर्षात ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांनी जातिव्यवस्था आणि साहित्यातील देशीवाद याला अनुसरून केलेल्या टीका-टिप्पणीचे पडसाद वाचक अभ्यासकांमध्ये प्रकर्षाने उमटू लागले आहेत. सखोल चिंतन, पक्की वैचारिक बैठक आणि प्रभावी युक्तीवाद ही वैशिष्ट्ये जपणाऱ्या डॉ. कसबे यांनी जातिव्यवस्थेच्या अंगाने भाष्य केले होते. तर अलीकडेच 'परिवर्तनाचा वाटसरू' या नियतकालिकात त्यांचा नेमाडे यांच्या साहित्यातील देशीवादाची कठोर चिकित्सा करणारा प्रदीर्घ लेख प्रकाशित झाला.

वैचारिक साहित्याची परंपरा स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षाही स्वातंत्र्योत्तर काळात समृद्ध झालेली दिसून येते. महाराष्ट्रातील अनेक लेखकांनी वैचारिक साहित्याचे दालन समृद्ध केले आहेत. यामध्ये महात्मा फुले, मुक्ता साळवे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, ताराबाई परांजपे, ताराबाई शिंदे, गो.ग. आगरकर, नरहर कुरूंदकर, गं.भा. सरदार, डॉ.गंगाधर पानतावणे, प्रा.शेषेराव मोरे, डॉ.जर्नादन वाघमारे, डॉ.ना.य. डोळे, प्रा.डॉ.बा.ह. कल्याणकर, प्रा.गजमल माळी, डॉ.नागोराव कुंभार, न्या.नरेंद्र चपळगावकर, जयदेव डोळे, श्रीपाल सबनीस या व अशा कितीतरी विचारवंतांचा आपल्याला उल्लेख करता येईल. थोडक्यात महाराष्ट्रातील विचारविश्व अधिकाधिक संपन्न आणि सकस होताना दिसते.

समतावादी व परिवर्तनवादी तसेच तत्त्वचिंतक व आंबेडकरी चळवळीचे गाढे अभ्यासक म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला लाभलेले थोर विचारवंत म्हणजे डॉ. रावसाहेब कसबे, परिवर्तनवादी विचारांशी असलेली त्यांची बांधिलकी सर्वदूर परिचित आहे. 'भारतात आधुनिकीकरण शक्य आहे, परंतु त्यासाठी पारंपरिक समाजव्यवस्था दूर सारावी लागेल किंवा तिला विभक्त कुटुंबपद्धतीत, सामाजिक वर्गात, खुल्या बाजारव्यवस्थेत, विवेकनिष्ठ शासकीय व्यवस्थेत आणि वैश्विक ज्ञान-विज्ञानाच्या प्रक्रियेत परिवर्तीत करावे लागेल' अशी विचारधारा डॉ. रावसाहेब कसबे यांच्या चिंतनाचा विषय आहे.

ज्ञानापासून वंचित बहुजन समाज हा डॉ.रावसाहेब कसबे यांच्या चिंतनाचा मुख्य केंद्रबिंदू तर आहेच, शिवाय मार्क्स व आंबेडकरी चळवळ हाही त्यांच्या चिंतनाचा मुख्य विषय आहे. वैचारिक साहित्यातून समाजाला परिवर्तनाची दिशा दाखवण्याचे काम त्यांनी केले. डॉ. रावसाहेब कसबे यांची सर्व वैचारिक पुस्तके शिक्षणात, विचारात सामाजिक परिवर्तनवादी व प्रबोधनात भर घालणारी आहेत. एक विचारवंत म्हणून 'आंबेडकरवाद तत्त्व आणि व्यवहार' आणि 'मानव आणि धर्मचिंतन' या पुस्तकांत डॉ. कसबे यांचे प्रतिबिंब उमटले आहे, हे प्रतिबिंब एका पुरोगामी लोकशाही, समाजवादी विचारवंताचे आहे. त्यांच्या चिंतनात एकीकडे स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, लोकशाही, समाजवाद या मूल्यांची चर्चा होतांना दिसून येते. तर दुसरीकडे जातीयता, अज्ञान, दारिद्र्य याविषयींचे विवेचन, विश्लेषण व कारणमिमांसा होताना दिसून येते.

महात्मा गांधीजींच्या कर्तृत्वामुळे जो काळ झाकाळून गेला होता त्या काळात अन्य माणसे मोठी असूनही त्यांचे मोठेपण दिसून आले नाही. यासंदर्भात रावसाहेब कसबे असे म्हणतात की, "गांधी हा वटवृक्ष होता. त्यांच्या सावलीखाली अन्य कोणत्याच नेत्याची वाढ होणे शक्य नाही." डॉ.कसबे यांचे मत पूर्णतः सत्य असल्याची प्रचिती येते.

डॉ.रावसाहेब कसबे हे एक महाराष्ट्राच्या वैचारिक साहित्यातील मानदंडच आहेत. म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स इत्यादी महामानवांच्या विचारांचा जागर त्यांनी महाराष्ट्रभर निस्पृहपणे घातलेला आहे. 'मानव आणि धर्मचिंतन', 'झोत', 'आंबेडकर आणि मार्क्स', 'आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना', 'आंबेडकरवाद तत्त्व आणि व्यवहार', 'धर्मग्रंथ आणि मानवी जीवनप्रवाह' इ. ग्रंथ महाराष्ट्रातील समाजमनाची उत्तम प्रकारे मशागत करणारे आणि वैचारिक साहित्याची उंची वाढविणारे आहेत. प्रभावी युक्तीवाद, वैचारिक परिपक्वता, समतोल वैचारिक मांडणी, विवेकपूर्ण व्यासंग, स्पष्टवक्तेपणा इत्यादी वैशिष्ट्यांची प्रचिती त्यांच्या वैचारिक ग्रंथामधून व भाषणांमधून येते. प्रज्ञावंत, प्रभावी आणि कृतिशील पुरोगामी विचारवंत म्हणून त्यांना समाजाची मान्यता आहे. त्यांच्या वैचारिक ग्रंथसृष्टीचा नम्र शोध संशोधक या नात्याने मी घेणार आहे.

- **अभ्यास विषयाची उद्दिष्ट्ये :**

१) वैचारिक साहित्याच्या स्वरूपाचा शोध घेणे.

२) डॉ.रावसाहेब कसबे यांच्या जीवनात आलेल्या संघर्षाचा शोध घेणे.

३) तत्कालीन समकालीन व राजकीय परिस्थितीच्या प्रभावाचा शोध घेणे.

४) सामर्थ्य आणि वैचारिक साहित्याच्या मर्यादांचा शोध घेणे.

- **गृहितके :**

१) वैचारिक साहित्याला एक महान परंपरा लाभलेली आहे.

२) रावसाहेब कसबे यांच्या वैचारिक साहित्यातून सामाजिक परिवर्तनाचा विचार व्यक्त झाला आहे.

३) रावसाहेब कसबे यांच्या वैचारिक साहित्याला कार्ल मार्क्स, महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा लाभलेली आहे.

४) रावसाहेब कसबे यांच्या वैचारिक साहित्याला व्यापक आणि सखोल चिंतनाची बैठक लाभली आहे.

- **संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी डॉ. रावसाहेब कसबे यांचे एकूण प्रकाशित ग्रंथ, लेख, भाषणे, वृत्तपत्र व नियतकालिकेतील लेख, व्याख्याने, विविध पुस्तकातून मांडलेले विचार, समीक्षणात्मक व वैचारिक ग्रंथ व मुलाखत इत्यादी माध्यमातून संशोधनात त्यांचा उपयोग करणार आहे. त्याचबरोबर सखोल अभ्यास करुन विषयाला न्याय मिळावा म्हणून मुलाखत, चर्चा, समाजशास्त्रीय, मार्क्सवादी, मानसशास्त्रीय, चरित्रात्मक, आंबेडकरवादी, आस्वादक समीक्षा पद्धती इत्यादी पद्धतींचा योग्य तेथे वापर करुन डॉ. रावसाहेब कसबे यांच्या वैचारिक साहित्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

- **संशोधन विषयाचे महत्त्व :**

डॉ. रावसाहेब कसबे यांचे विचार व वैचारिक साहित्य राष्ट्रीय विकासासाठी व सामाजिक परिवर्तनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. वैचारिक दारिद्र्य निर्माण झालं की गुलामीला

सुरुवात होते. विचाराच्या कक्षा जसजशा रुंदावत जातील तसतसा विचार झपाट्याने होत जातो अन्यथा वर्षानुवर्ष माणूस गुलाम व लाचार बनतो. अशावेळी विचार माणसाला तारतो व त्यातील स्वाभिमान जागृत करुन समाजात ताठ मानेने जगण्याची दिशा मिळते. यामुळे जणू माणुसकी व समताधिष्ठीत समाज हा डॉ. रावसाहेब कसबे यांच्या चिंतनाचा विषय आहे. यांच्या वैचारिक साहित्यावरील संशोधनामुळे निश्चितच सर्वसामान्य गरीब, कष्टकरी माणसाला दिशा मिळू शकेल ही माझ्या संशोधनाची उपयोगिता आहे.

- **विषय निवडीमागील भूमिका :**

कोणत्याही प्रकारच्या वैचारिक लेखनाला एक शिस्त असते, दिशा असते. ज्या ज्ञानशाखांचा लेखक हवाला घेतो त्यांची केवळ नावे लिहून किंवा बोलून उपयोगाचे नसते. त्या ज्ञानशाखांचे आपल्याला किती ज्ञान आहे, हे वारंवार तपासत पुढे जावे लागते. नव्या अभ्यासाने जुनी मते बदलावी लागतात. याच भावनेतून समाजपरिवर्तनवादी साहित्य वाचण्याची आवड निर्माण झाली. सामाजिक कार्यात हळूहळू सहभाग घेऊ लागलो. संपर्कात आलेल्या सर्व व्यक्ती परिवर्तनावादी विचाराच्या असल्यामुळे माझ्या वाचनाला गती निर्माण झाली. त्यामुळे म.जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स, अण्णा भाऊ साठे, शाहू महाराज यांचे समग्र साहित्य वाचण्यात आले.

त्यातच अलिकडील काळात ज्यांचे वैचारिक ग्रंथ माझ्या मनावर प्रभाव टाकून गेले ते डॉ. रावसाहेब कसबे यांच 'मानव आणि धर्मचिंतन', 'धर्मग्रंथ आणि मानवी जीवनप्रवाह' ही पुस्तके जेव्हा वाचण्यात आली तेव्हा त्यांच्या विचाराने प्रभावीत होऊन त्यांचे साहित्य वाचण्याची आवड निर्माण झाली. याच आवडीतून त्यांच्या वैचारिक चिंतनाचा संशोधनासाठी विषय निवडावा असे वाटले. याविषयी मी डॉ. राजकुमार मस्के यांच्याशी विचारविनीमय करून 'डॉ. रावसाहेब कसबे यांच्या वैचारिक साहित्याचा चिकित्सक अभ्यास' असा विषय निवडला आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

डॉ.रावसाहेब कसबे हे वैचारिक साहित्य क्षेत्रातील एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व आहे. परिवर्तनाची अचूक दिशा दाखवणारे त्यांचे साहित्य आहे. प्रस्तुत संशोधनात डॉ.रावसाहेब

कसबे यांच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय, आंबेडकरवादी, मार्क्सवादी इ. वैचारिक लेखनाचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. या विषयाची व्याप्ती जरी सखोल असली तरी संशोधक म्हणून मला काही मर्यादाही आहेत. डॉ.रावसाहेब कसबे यांच्या वैचारिक साहित्यापुरते प्रस्तुत संशोधन मर्यादित राहील, ही या संशोधनाची मर्यादा सांगता येईल.

प्रस्तुत विषयाचे संशोधन खालील प्रकरणांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले

वैचारिक साहित्याचे स्वरूप आणि संकल्पना

- वैचारिक साहित्याचा इतिहास
- वैचारिक साहित्याच्या व्याख्या
- वैचारिक साहित्याची संकल्पना
- वैचारिक साहित्याचे स्वरूप
- वैचारिक साहित्य-प्रेरणा, प्रयोजन आणि प्रभाव
- वैचारिक साहित्याचे विशेष
- सद्यस्थिती आणि वैचारिक साहित्य

प्रकरण दुसरे

डॉ. रावसाहेब कसबे यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण

- जन्म व बालपण
- शिक्षण
- वैवाहिक जीवन
- वक्तृत्व
- कौटुंबिक परिस्थिती
- व्यवसाय
- तत्कालीन परिस्थिती
- प्रेरणा
- प्रभाव

- साहित्यिक योगदान
- चळवळीतील सहभाग आणि कार्य
- पुरस्कार व मान-सन्मान
- वैचारिक साहित्यातून व्यक्तिमत्त्वाचे घडणारे दर्शन
- निष्कर्ष

प्रकरण तिसरे

डॉ.रावसाहेब कसबे यांचे सामाजिक व धार्मिक विचार

सामाजिक विचार

- समतेची संकल्पना
- स्वातंत्र्य
- सामाजिक न्याय
- बंधुता
- लोकशाही
- अस्पृश्यता
- जातीयता
- विषमता
- समान संधी
- आरक्षण
- व्यक्तिस्वातंत्र्य
- मानवतावाद

धार्मिक विचार

- धर्म म्हणजे काय?
- धर्माची चिकित्सा
- धर्म व संस्कृती
- स्त्रीविषयक विचार

- प्रसारमाध्यमे
- वैज्ञानिक दृष्टिकोन

प्रकरण चौथे

डॉ.रावसाहेब कसबे यांचे शैक्षणिक व राजकीय विचार

शैक्षणिक विचार

- प्राथमिक शिक्षण
- माध्यमिक शिक्षण
- उच्च माध्यमिक शिक्षण
- शिक्षण व स्त्री
- जागतिकीकरण आणि शिक्षण
- शिक्षण आणि बहुजन
- शिक्षणाचे माध्यम
- शिक्षण व गुणवत्ता
- शिक्षण व समाज
- शिक्षण आणि व्यवसाय
- शिक्षण व आरक्षण
- शिक्षण व युवक
- विद्यार्थी व शिक्षक
- शिक्षण आणि ग्रामीण जीवन
- व्यक्तिमत्त्व विकास आणि शिक्षण

राजकीय विचार

- प्रशासन आणि राजनिती
- लोकशाही केंद्रित राजनिती
- प्रशासकाची सकारात्मक दृष्टी
- सत्तेचे विकेंद्रीकरण

- कायदा आणि प्रशासन
- शासन आणि लोकसंख्या

प्रकरण पाचवे

डॉ.रावसाहेब कसबे यांचे आंबेडकर, मार्क्सवाद व सत्यशोधकी विचार

डॉ.रावसाहेब कसबे यांच्या विविध वैचारिक ग्रंथातून व्यक्त झालेल्या आंबेडकरी, मार्क्सवादी, सत्यशोधकी विचारांचा शोध या प्रकरणाच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

डॉ.रावसाहेब कसबे यांच्या वैचारिक साहित्याचे विशेष

- मानवता
- सखोल चिंतन
- प्रभावी युक्तीवाद
- बुद्धीप्रमाण्यवाद
- तार्किकता
- वस्तुनिष्ठपणा
- भाषाशैली
- व्यक्तीचित्रणे
- समतोल मांडणी

प्रकरण सातवे

निष्कर्ष

- निष्कर्ष
- परिशिष्ट

  अ) मुलाखत

  ब) प्रश्नावली

डॉ. रावसाहेब कसबे यांची ग्रंथसंपदा

१) मानव आणि धर्मचिंतन

२) हिंदू-मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद

३) झोत

४) आंबेडकर आणि मार्क्स

५) आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना

६) भक्ती आणि धम्म

७) देशवासी समाज आणि साहित्य

८) धर्मग्रंथ आणि मानवी जीवनप्रवाह

९) रेषेपलीकडील लक्ष्मण.

१०) आंबेडकरवाद तत्त्व आणि व्यवहार

११) सम्यक परिवर्तन-संपा. ग्रंथ

१) डॉ. रावसाहेब कसबे

२) डॉ. यशवंत मनोहर

* आधारभूत ग्रंथसूची

* संदर्भग्रंथ सूची

संशोधक — **प्रल्हाद शंकरराव येवरीकर**

मार्गदर्शक — **प्रा.डॉ.राजकुमार खंडू मस्के**